"मराठवाड्यातील महानुभाव पंथीय तपस्वीनी/साध्वी/स्त्री जीवन : एक समाजशास्त्रीय अभ्यास"

सामाजिक शास्त्रे विद्याशाखेतील समाजशास्त्र विषयात वाङ्मय आचार्य (पीएच.डी.) पदवीसाठी सादर करावयाच्या शोधप्रबंधाचा प्रथम आराखडा

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड.

:: संशोधक ::

चंद्रकांत गौतम गजभारे

एम. ए.,(समाजशास्त्र),नेट, बी.एड.

:: मार्गदर्शक ::

प्रा. डॉ. के.सी. शेंडे

सहयोगी प्राध्यापक व संशोधन मार्गदर्शक

समाजशास्त्र विभाग प्रमुख,पीपल्स कॉलेज, नांदेड

:: अभ्यास केंद्र ::

सामाजिक शास्त्र संकुल, संशोधन केंद्र,

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

ऑक्टोबर- २०१९

प्रस्तावना :

समाज शास्त्राचा जनक ऑगस्त कॉम्त यांनी The course of positicve philosophy या ग्रंथात Sociology हा शब्द सर्व प्रथम वापरला. समाजाचा अभ्यास अनेक शाखामध्ये केला जात आहे. उदा. ग्रामीण समाजशास्त्र, आदिवासी समाजशास्त्र, आद्योगिक समाजशास्त्र, वैद्यकिय समाजशास्त्र लिंग आणि समाज Gender and Society या शाखेत स्त्रीयाचा अभ्यास केला जातो.

मानवाच्या उत्त्पती पासून धर्म, संस्कृती, पंथ, तंत्त्वज्ञान इत्यादीशी मानवाचा संबंध आला. धर्म, परपंरा, संस्कृती प्रिय देश म्हणून भारत उल्लेखला जातो. भारतात प्राचीन काळात अनेक धर्म उदयास आले प्रत्येक धर्मात पंथ असलेला दिसून येतो उदा. जैन धर्मात दिंगबर श्वतेंबर, बौध्द धर्मात हिंनयान महायान, ख्रिचन धर्मात प्रोटेस्टेट आणि कॅथलिक, मुस्लिम धर्मात सिया आणि सुत्री तर शिख धर्मात खालसा पंथ त्याच प्रमाणे महानुभव पंत आपले वास्तव्य टिकून आहे.

महाराष्ट्राला संत आणि पंथाची भूमी म्हणून ओळखली जाते. महानुभव पंथीय लोकाना काय म्हणतात त्यांचे धार्मिक कार्य काय आहेत. पंथामध्ये स्त्रीयांचे स्थान कसे आहे. त्यांची संस्कृती कोणती असते व महानुभवपंथामध्ये स्त्रीचे सामाजिक जिवन कोणत्या स्वरुपाचे असते याचा अभ्यास महत्त्व पूर्ण ठरणार आहे.

या पंथात प्रवेश करण्यापुर्वी महानुभवपंथाच्या परपंरेनुसार महानुभव पंथीय मठाच्या मठादिशाकडुन उपदेश घेवून पंथाचा सदस्य होता येते तसेच त्यामधील एक भाग म्हणून सन्यासी वृत्ती येते. मठाधिशाकडून दिक्षा घेवून सन्यास घ्यावी लागते. पंथात प्रवेश करणे म्हणजे व संन्यास घेणे म्हणजे संपूर्ण गृहस्थ व कौटुंबिक जीवनाचा त्याग करुन कृष्णभक्तीसाठी देवप्राप्तीसाठी उपासना करणे, धर्म प्रचार करणे होय. म्हणून सद्या जनकल्याणासाठी महानुभवपंथात स्त्रीयांची वाढ होताना दिसून येत आहे.

महानुभवपंथामध्ये आपल्या गृहस्थ, कौटूंबिक जीवनाचा त्याग करुन स्त्रिया संन्यास घेतात तेंव्हा अशा स्त्रीयांचे सामाजिक जीवन, व्यक्तीगत जीवन व आर्थिक व शैक्षणिक जीवन तसेच धार्मिक सांस्कृति जीवन कशा प्रकारचे आहे, व महानुभव पंथीय स्त्रीला काय म्हणतात. याच समाजशास्त्रीय दृष्टीकोनातून अभ्यास करणे महत्त्वाचे ठरणार आहे.

महानुभव पंथीय स्त्री म्हणजे तपस्विनी सादवी म्हणजे असी स्त्री जी पंथामध्ये पंथाच्या रिवाजानुसार परपंरेनुसार त्याग करुन पंथाची दिक्षा घेवून, काशाय वस्त्र स्विकारुन देवप्राप्तीसाठी, पंथ प्रचारासाठी, व समाज प्रबोधनासाठी, महानुभव पंथाची विचार समाजापर्यंत पोहचवण्यासाठी सन्यास घेते. आणि मुंडण करुन महानुभव मठात कायम स्वरुपी राहते. अशा स्त्रीला तपस्विनी किंवा सादवी असे म्हणतात म्हणून संशोधकाने हा अभ्यास विषय निवडला आहे.

- **संभाव्य संकल्पना :-**

संशोधनाचा विषय निश्चित झाल्यावर त्याच समाविष्ट होणाऱ्या सर्व संज्ञानची व संकलपनाची यादी तयार करावी लागते. म्हणून प्रस्तुत संशोधन विषयाच्या अनुषंगाने महानुभव पंथीय स्त्री/सादवी/तपस्विनी यांचे आर्थिक सांस्कृतिक, धार्मिक, सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक व व्यक्त्ीगत जीवन इ. संकल्पनांचा आवश्यकतेनुसार अभ्यास करण्यात येणार आहे.

- **महानुभव पंथाची ऐतिहासिक पार्श्वभूमी :-**

महानुभव पंथाचा उदय महाराष्ट्रराज्यात मराठवाडा विभाग नांदेड जिल्ह्यात राहेर या गावी झाला. या पंथाचा प्रसार संपुर्ण भारतात आहे. हा पंथ भारतातील महाराष्ट्र व गुजरात राज्यात बहुतांशी प्रमाणात दिसुन येतो. महानुभव पंथाचे जनक म्हणून गोविंद प्रभू यांची ख्याती आहे. ते महानुभावाचे पहिले गुरु आहेत. महानुभव पंथाच्या सुरुवातीच्या काळात महदंबा नावाची एकच स्त्री होती. या स्त्रीला महानुभव

पंथातील कवयत्री म्हणून ओळखली जाते. पंथाच्या सुरुवातीला स्त्रीयाचे प्रमाण खुप कमी होते प्रचलीत समाजामध्ये महानुभव पंथात स्त्रीयांची/ तपस्विनीची वाढ होत आहे. आणि या स्त्री महानुभव पंथाचे श्रध्दास्थान असलेले कृष्णमंदीर व महानुभव पंथ मठ आणि आश्रमात राहतात. इ.स. ० वर्षा पुर्वी पंथा विषयी ग्रंथ लेखन उपलब्ध नव्हते, या पंथाचे १२ शतकाच्या सुरुवातीला या पंथाचे लिखान सुरु झाले. त्यामध्ये प्रामुख्याने अधिकाधिक ग्रंथ लेखन "चक्रधर स्वामी" यांनी केले. महानुभव पंथाच्या लिखित ग्रंथाद्वारे हा पंथ हळूहळू सर्व समाजाला समजू लागला आणि आचरणात येण्यास सुरुवात झाली. महानुभवपंथ ग्रंथाद्वारे समाजापर्यंत पोहचला तेंव्हा पंथांच्या नियमांची, पंथात असणाऱ्या शिस्थीची आणि परंपरेची जाणीव समाजाला झाली पण अलिकडच्या काळात हा पंथ समाजात अधिक प्रमाणात दिसतो व या पंथामध्ये स्त्रियांचे आकर्षण बहुतांश प्रमाणात दिसत आहे. मराठवाड्यात या पंथांची निर्मिती झाली असल्यामुळे या पंथांचे लोक महाराष्ट्रामधील मराठवाडा विभागात अधिक प्रमाणात आहे. म्हणून संशोधकाने वस्तुनिष्ठ अभ्यासासाठी महानुभव पंथीय स्त्री जीवन हा विषयी निवडला आहे.

- **संशोधन साहित्याचे सिंहावलोकन :-**

प्रस्तुत संशोधन विषयाच्या अनुषंगाने संबंधी साहित्याचा आढावा घेतला असता प्रादेशीक व राष्ट्रीय स्तरावर विविध समाजशास्त्रज्ञानी धर्माचा व पंथाचा समाजिक दृष्टीकोणातून अभ्यास केला आहे. भारतात एकुण सात धर्म आहेत. प्रत्येक धर्मात वेगवेगळे पंथ आहेत. या पंथाचा प्रादेशिक व राष्ट्रीय स्तरावर समाजशास्त्रीय दृष्टीकोनातून अभ्यास झाला असुन त्यांचा आधार मी माझ्या संशोधन कार्यात घेणार आहे. त्यांनी वापरलेल्या अध्ययन पध्दती तथ्य संकलनाचे तंत्र त्यांनी काढलेले निष्कर्ष इ. पैलुंचे अध्ययन करुन मी माझ्या संशोधनामध्ये योग्य त्या ठिकाणी या संशोधन साहित्याचा आधार घेणार आहे.

- **संशोधन पध्दती :-**

प्रत्येक शास्त्र जे विकसित होत असतो ते त्या होत असलेल्या सततच्या संशोधनामुळे होते. त्यामुळे संशोधन हे सतत चालणारी प्रक्रिया ठरते. विकासासाठी जशी संशोधनाची आवश्यकता आहे. तशीच ती भुतकाळातील व ऐतिहासिक पर्श्वभूमि जाणुन घेण्यासाठी आवश्यक असते. मानवी समाजाचे सखोल अध्ययन करणे हा समाजाशात्रीय संशोधनाचा महत्त्वाचा उद्देश राहिला आहे. या सामाजिक संबंधाचे अध्ययन करण्यासाठी समाजिक संशोधन पध्दतीचा विकास करण्यात आला. श्रीमती. पॉलींग यंग यांच्यामते "समाजिक संशोधन म्हणजे समाजिक जीवनाबाबत नवीन तथ्य संशोधण्यासाठी अथवा जुन्या तथ्यांचे परिक्षण करण्यासाठी त्या तथ्यातील अनुक्रम परपंरा संबंध व कार्यकारण भाव या विषयी स्पष्टीकरण व सामान्यकरण प्रस्तापित करण्याची एक पध्दतीशिर प्रक्रिया होय."

वरील व्यवस्थेवरुन हे स्पष्ट होते की, समाजिक संशोधन ही मानवाच्या समाजिक जीवनाच्या विविध पैलुंचे अध्ययन करण्याचे वैज्ञानिक पध्दती आहे. सामाजिक संशोधनामुळे ज्ञान प्राप्ती होते. जुन्या ज्ञानांचे परिक्षण होते. जीवनातल्या अनेक रहस्यांचा उलघडा होतो आणि सामाजिक वास्तवेसंबंधी आपले ज्ञान विकसित होत जाते. घटनेतील कार्यकरण संबंध माहिती झाल्यामुळे नियंत्रण ठेवून कार्य हवे तसे घडवून आणता येतात मानवाला व मानवी समाजाला उपयुक्त गोष्टी निर्माण करता येतात. आधुनिक जगात ज्ञानाच्या प्राप्तीसाठी संशोधनाला पर्याय नाही. यावरुन संशोधनाचे महत्त्व लक्षात येते. म्हणुन मराठवाड्यातील महानुभव पंथीय स्त्री/तपस्विनीचे जीवन निवड प्रस्तुत संशोधन करीता संशोधन पध्दतीचा वापर करण्यात येणार आहे.

- **संशोधन आराखडा :**

मानवी जीवनातील कोणतेही कार्य सुव्यवस्थिती पारपाडावयाचे झाल्यास प्रथम त्या कार्याचा आराखडा तयार करावा लागतो. हिच गोष्ट संशोधनालाही लागु होते. प्रत्येक संशोधनासाठी संशोधनाचे विशेष महत्त्व आहे. विमल शाहा यांच्या मते 'आराखडा म्हणजे अभ्यासाची योजना असते नियोजित व अनियंत्रीत व्यक्तीनिष्ट व वस्तुनिष्ट अशा सर्व प्रकारच्या अभ्यासाठी योजना तयार केली जाते.' पुर्व नियोजन हा संशोधनाचा आत्मा आहे. प्रत्यक्षात संशोधनाला सुरुवात करण्यापुर्वी पुर्व नियोजन केले जाते.

- **संशोधनाची व्याप्ती व मर्यादा :-**

संशोधनाला संशोधनाची व्याप्ती ठरविल्यामुळे तत्य संकलन कार्याला व प्रकटीकरणाला मदत होत असते. तथ्य संकलन दिशाहिन होत नाही. विशेष बाह्य संशोधनला आळा बसतो. म्हणुन संशोधकाने प्रस्तुत विषयाच्या अनुषंगाने संशोधकाच्या व्याप्ती पुढील प्रमाणे विशद केली आहे. मराठवाड्यातील महानुभव पंथीय स्त्री/ तपस्विनी जीवनाचे तसेच सामाजिक, धार्मिक, आर्थिक, शैक्षणिक, सांस्कृतिक आणि व्यक्तीगत जीवनाचे आणि महानुभव पंथीय स्त्री जीवनाच्या बदलत्या स्वरुपाच्या संबंधी घटकांचा आणि वैवाहिक, कौटुंबिक पैलुंचे अध्ययन करण्यात येणार आहे.

महानुभव पंथीय स्त्री/ तपस्विनीचे व्यक्तीगत जीवनाच्या अभ्यासामध्ये त्याचा आहार विषय, त्यांच्या कौटुंबिक विषय, त्यांचे वैवाहिक जीवन, इ. विषयी अभ्यास करण्यात येणार आहे. तसेच परिवर्तन हा निसर्गाचा आणि समाजाचा नियम असुन महानुभव पंथीय स्त्री जीवनात होणारे परिवर्तन किंवा बदलते स्वरुप या विषयी अभ्यास करण्यात येणार आहे.

संशोधकाने विषयाच्या संदर्भात वरील प्रमाणे संशोधनाची व्याप्ती संबंधीत पैलुं संशोधकाने स्पष्ट केलेले आहेत. संशोधनाच्या व्याप्ती बरोबरच संशोधकाच्या काही

मर्यादा असणार आहेत. यामध्ये संशोधक राष्ट्रीय स्तरावर अभ्यास करु शकणार नाही. आणि करावयाचे म्हटले तरी शक्य होणार नाही. म्हणुन संशोधकाच्या संशोधनाच्या विषयो अध्ययन क्षेत्र फक्त मराठवाड्यातील महानुभव पंथीय मठात असणाऱ्या स्त्रीया पैकी शंभर (२००) स्त्री असणार आहेत. संशोधकाच्या संशोधनातुन काढण्यात येणारे निष्कर्ष महाराष्ट्र व मराठवाड्यातील महानुभव पंथाला लागु पडणार आहे तसेच माझ्या संशोधनामध्ये महानुभव पंथीय स्त्रीयांच्या व्यक्तीगत जीवनाचा समाजिक, धार्मिक, आर्थिक, शैक्षणिक, सांस्कृतिक आणि व्यक्तीगत जीवनाचा अभ्यास करणार आहे. इतर सामाजिक पैलु आहेत. त्यांचा अभ्यास करणे शक्य नाही.

- **संशोधनाचे महत्त्व :**

भारतीय समाजव्यवस्थेतील धर्म पंथाच्या अभ्यासात संशोधकाला आवड निर्माण झाली तसेच भारतीय धर्म पंथा विषयी अध्यायनात बऱ्याच पाश्चीमात्य व भारतीय विचारवंतानी योगदान दिले आहे परंतु महानुभव पंथावर समाजशास्त्रीय दृष्टिकोनातुन अध्ययन झाल्याचे आढळत नाही. महानुभव पंथ अध्ययनाची उणीव जाणवते त्याच प्रमाणे आधुनिक समाजात धर्माचे वाढते प्रसार व सामाजिक परिणाम व त्यांचे जीवन शैलीचे व धर्मपंथ आण पंथ विचारांचे परिणाम समाजात दिसून येत आहेत. म्हणुन या विषयाबाबात संशोधकाची आवड व महानुभव पंथाच्या सुक्ष्म सरचनेच्या अध्ययनाची उणीव या दोन्हींचा मेळ घालण्याच्या प्रयत्न संशोधक प्रस्तुत विषयात संशोधनातून करणार आहे. प्रस्तुत विषयाची समाजिक उपयोगीता पुढील प्रमाणे असेल.

१. महानुभव पंथीय स्त्रीचे/ तपस्विनीचे समाजिकजीवन, व्यक्तीगत जीवन, वैवाहिक जीवन, त्यांची दिनचर्या पेहराव, सामाजिक दर्जा, इ. पैलुंचे वास्तव समाजापुढे येईल.
२. संशोधनातुन पुढे आलेल्या उणीवा समस्यांचे निदान करुन उपाय योजना आखल्या जातील.

३. महानुभव पंथीय स्त्री/ तपस्विनी जीवन व त्यांच्या पंथाची ओळख समाजाला करुन देणे प्रस्तुत संशोधनाची सामाजिक उपयोगीता राहिल.

४. महानुभव पंथ प्रसाराचे महत्त्व जाणून घेण्यास मदत होईल.

- **संशोधनाची उद्दिष्ट्ये :-**

भारतीय समाजात विविध धर्म पंथ असुन सुध्दा एकात्मतेची ओळख करुन देणारी भारतीय समाज व्यवस्था जगातील सर्वात श्रेष्ठ समाज व्यवस्था म्हणून ओळखली जाते समाज निर्मीतीपासुनच धर्म पंथ यांनी सामाजिक एकात्मता व सामाजिक संतुलन राखण्यासाठी व मदत केली आहे. धार्मिक आणि पंथीय साधु, संत, भिक्शु, यांच्याकडुन हे कार्य होत असतातना दिसते. सामाजिक संतलन ठेवण्यासाठी व प्रबोधनासाठी साधु, संत, भिक्शु, यांच्या जीवनावर प्रकाश टाकणे महत्त्वाचे असते. त्यामुळे मुख्यत: पंथीय स्त्री जीवनावर अभ्यास करणे आहे म्हणून महानुभव स्त्री जीवनाचा अभ्यास करण्याच्या दृष्टीने पुढील प्रमाणे संशोधनाची उद्दिष्ट्ये निश्चित करण्यात आली आहेत.

१. महानुभव पंथीय स्त्री/ तपस्विनीचे व्यक्तीगत जीवनाची पाहणी करणे, अध्ययन करणे.

२. सामाजिक आणि आर्थिक जीवनाचा आढावा घेणे.

३. महानुभव पंथीय स्त्री/ तपस्विनीचे शैक्षणिक व सांस्कृतिक आणि धार्मिक जीवनाचा अभ्यास करणे.

४. महानुभव पंथाच्या प्रसाराची कारणमीमांसा जानुन घेणे.

५. महानुभव पंथीय स्त्री/ तपस्विनींच्या जीवनाच्या बदलत्या सवरुपाचे आवलोकन करणे.

- **गृहितकृत्य/उपकल्पना/संभाव्य उत्तर :-**

संशोधन समसयेचे निर्धारण झाल्यानंतर त्या संदर्भात काही अनुमाने व संभाव्य उत्त्रे काढले जातात. त्यामुळे संशोधक आपले लक्ष्य काही निश्चित व आवश्यक तथ्यावरच केंद्रीत करतो. त्यामुळे संशोधकाला निश्चित दिशा प्राप्त होते. या अनुमानाला व संभाव्य उत्तराला गृहितकृत्य अथवा उपकल्पना असे म्हणतात. कोहन न्यागेल यांच्यामते 'चौकशी व संशोधनास चालनादेणारे आडचणीचे व समसयेचे संभाव्य निराकरण वा उत्तर सुचविल्याशिवाय आपण संशोधन कार्यात पाहिले पाऊल सुध्दा उचलू शकत नाही. या वरुन संशोधनातले गृहितकृत्याचे महत्त्व लक्षात येते. म्हणून प्रस्तुत विषयाच्या संशोधनाकरीता पुढीलप्रमाणे गृहितकृत्ये मांडलेली आहेत.

१. महानुभव पंथीय स्त्री/तपस्विनी गृहिस्थी, वेवाहिक, जीवन उपभोगु शकत नाहीत.

२. महानुभव पंथीय स्त्री/ तपस्विनी मध्ये शिक्षणाचे प्रमाण कमी असलेले दिसुन येते.

३. महानुभव पंथीय स्त्री/तपस्विनीमध्ये आर्थिक स्वावलंबन दिसुन येत नाही.

४. महानुभव पंथीय स्त्री/तपस्विनीचे सामान्य स्त्री तुलनेत संस्कृती भिन्न असलेली दिसून येते.

५. महानुभव पंथीय स्त्री/तपस्विनीचे सामाजिक जीवन परिवर्तनशिल असते.

- **संशोधनाचे क्षेत्र :-**

संशोधन समसयेचे निर्धारण झाल्यानंतर हे अध्ययन कोणत्या भौगोलिक क्षेत्रात करायचे किंवा अध्ययनाचे क्षेत्र कोणते असणार आहे हे ठरविणे आवश्यक असते. त्याशिवाय अध्ययन विश्व निश्चित होणार नाही म्हणून सामाजिक क्षेत्रात संशोधन करत असताना प्रत्येक संशोधकाला संशोधनाचे क्षेत्र निश्चित करावे लागते. संशोधन क्षेत्र ठरविल्यामुळे तथ्य संकलनाला संशोधन कार्याला निश्चित दिशा प्राप्त होते. संशोधन वेळेत पुर्ण होण्यासाठी मदत होते संशोधन विषयाला न्याय देता येतो. अशा प्रकारे संशोधन क्षेत्र निश्चित करण्याला अतिशय महत्त्व आहे. प्रस्तुत विषयाच्या

संशोधनासाठी महाराष्ट्र राज्यातील मराठवाड्याची निवड केली आहे. मराठवाड्यातील महानुभवपंथीय मठातील, आश्रमातील आणि मंदिरातील महानुभव पंथीय स्त्रीयांचा तपस्विनीचा समावेश आहे.

- **संशोधन क्षेत्राची ओळख :-**

महाराष्ट्र राज्यातील मराठवाडा विभागात एकूण सात जिल्ह्याचा समावेश आहे. मराठवाड्याची राजधानी ही औरंगाबाद आहे. मराठवाड्याच्या शैक्षणिक विकासासाठी औरंगाबाद येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर विद्यापीठाची स्थापना झाली. तेंव्हापासुन या विद्यापीठाशी सलग्नीत असलेला भाग म्हणून मराठवाड्याची वेगळी ओळख निर्माण झाली आहे.

- **नमुना निवड :-**

संशोधनासाठी जो विषय निवडलेला असतो त्याविषयासंबंधी संपूर्ण विश्व किंवा समग्राचे अध्ययन करणे संशोधनकर्त्याला शक्य नसते. म्हणून समग्राच्या प्रातिनिधिक एककाची निवड करुन त्याचेच अध्ययन केले जाते. नमुना निवड या तंत्रामुळे संशोधनात वेळ, पैसा, श्रम याची बचत होते तसेच संपूर्ण समग्राच्या अध्ययनाचे निष्कर्ष व नमुना तंत्राच्या या उपयोगामुळे प्रस्तुत संशोधनासाठी नमुना निवड प्रकारातील साहित्य, संदर्भ ग्रंथ, याचा वापर करुन उत्तरदात्याचे निवड करण्यात येणार आहे. मराठवाड्यातील महानुभव पंथीय मठ आश्रम मंदिरातूनल मी प्रत्येकी पाच स्त्रिया/ तपस्विनी नमुना निवड प्रकाराचा आधार घेवून निवड करणार आहे. या तपस्विनीची संख्या २०० असणार आहे.

- **तथ्य संकलनाचे तंत्रे :**

सामाजिक संशोधनाला तथ्ये संकलनाला अतिशय महत्त्व आहे. कारण संशोधनात कार्याची सुरुवात समारोप सुध्दा तथ्यांच्या आधारानेच होत असते.

संशोधक तथ्य सामग्रीला आपल्या अध्ययनाचा आधार मानुन कार्यपुर्ण करतो. त्याशिवाय संशोधनाचे कार्य पुर्ण होत नाही. म्हणून तथ्याचे संकलन शास्त्रीय पध्दतीने करणे आवश्यक असते. तथ्य संकलनाकरीता प्राथमिक स्त्रोतातील अनुसूची वापर करण्यात येणार आहे. कारण महानुभवपंथीय स्त्री/तपस्विनी मध्ये एक तृतीयांश अशिक्षित आहेत. तथ्य संकलनासाठी प्राथमिक स्त्रोतातील वापर करणार आहे. द्वितीय स्त्रोतासाठी अप्रकाशीत ग्रंथ, आत्मचरित्र, मासिके, विशेषांक, वर्तमानपत्र, शोधप्रबंध इ. आवश्यक तथ्य सामग्रीचे संकलन करण्यात येणार आहे.

- **तथ्याचे वर्गीकरण व आशय विश्लेषण :-**

तथ्याचे संकलन केल्यानंतर तथ्याचे संपादन, तथ्याचे साम्य व भेदाचे आधारे वर्गीकरण, सांकेतिकरण हे महत्त्वाचे टप्पे पार पाडल्यानंतर प्राप्त माहितीच्या तथ्यात रुपांतर करणे हा आशय विश्लेषणाचा उद्देश आहे. त्यामुळे ती तथ्य वैज्ञानिक पध्दतीने उपयोगात आणून निष्कर्ष काढता येतात. विश्लेषणासाठी आशय विश्लेषण तंत्राचा वापर करण्यात येणार आहे.

- **निष्कर्ष व शिफारशी :-**

संशोधनात प्राप्त झालेल्या माहितीच्या आधारे विषयांचे उद्देश व गृहितकृत्ये तपासुन योग्य ते निष्कर्ष काढून आवश्यक त्या सुचना करण्यात येणार आहेत.

- **प्रकरणाची रचना :-**

प्रकरण १ ले : प्रस्तावना

प्रकरण २ रे : संशोधन पध्दती

प्रकरण ३ रे : महानुभपंथीय स्त्री/तपस्विनींचे व्यक्तिगत जीवन

प्रकरण ४ थे : महानुभपंथीय स्त्री/ तपस्विनींचे आर्थिक जीवन

प्रकरण ५ वे : महानुभपंथीय स्त्री/तपस्विनीचें शैक्षणिक, सांस्कृतिक, धार्मिक जीवन

प्रकरण ६ थे : महानुभपंथीय स्त्री/ तपस्विनींचे बदलते स्वरुप (परिवर्तन)

प्रकरण ७ वे : निष्कर्ष आणि सूचना

संदर्भग्रंथ सुची :	**लेखक**
१. महानुभव आचारधर्म -	व्हि. भी. कोलते
२. महदंबा बेचे धवळे -	महदंबा
३. स्मृतीस्थळ -	रा. गो. तळपूळे
४. रुक्मिनी स्वयंवर -	नरेंद्र
५. रक्मिनी स्वयंवर -	सुहसिनी कारले
६. मराठी वाङःमयाचा इतिहास - (खंड पहिला आणि दुसरा)	मराठी साहित्य प्रकाशन परिषद
७. महानुभव तत्वज्ञान -	कोलते
८. लिळा चरित्र -	म्हाहिमभट्ट
९. हिंदू जगण्याचे समृध्द अडगळ -	भालचंद्र नेमाडे
१०. सामाजिक संशोधन पध्दती -	प्रदिप आगलावे
११. सामाजिक संशोधन पध्दजी -	बोधनकर

संशोधक

चंद्रकांत गौतम गजभारे

एम. ए. (समाजशास्त्र). नेट, बी.एड,

मार्गदर्शक

प्रा. डॉ. के.सी. शेंडे

सहयोगी प्राध्यापक व संशोधन मार्गदर्शक

समाजशास्त्र विभाग प्रमुख,पीपल्स कॉलेज, नांदेड